**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३ रा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्डइस्टेट, फोर्ट,मुंबई४०० ००१.
दूरध्वनी क्र.२२६१४९८४/८५,Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ १३० /सन २०१९-२०
फोर्ट, मुंबई ४०० ००१ दिनांक: १९/०३/२०२०

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **२९** वी बैठक दिनांक **०५/०३/२०२०** रोजी **जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे कार्यालय, ओल्ड कस्टम हाऊस, फोर्ट, मुंबई** येथे घेण्यात आली.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने इतिवृत्तातील सूचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन कांदळवन तक्रारींबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी या कार्यालयात सादर करावा, ही विनंती.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

## कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची २९ वी मासिक बैठक

## दि.०५/०३/२०२० रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली सदरची बैठक घेण्यात आली. अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत केले व समितीच्या बैठकीस सुरुवात केली. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी दौंड | विभागीय आयुक्त कोकण विभाग | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, बेलापूर, नवी मुंबई. |
| २ | श्री. वीरेंद्र तिवारी | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ३ | श्री. सिध्दराम सालीमठ, | उप.आयुक्त (महसूल) कोकण विभाग | विभागीय आयुक्त कोकण विभाग |
| ४ | श्रीमती. निनु सोमराज | उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ५ | श्रीमती सुलोचना कळंबे | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | पोलीस आयुक्त , मुंबई. |
| ६ | श्रीमती मनिषा प्रधान | प्रधान प्रदुषण नियंत्रण अधिकारी ठाणे महानगरपालिका | प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे महानगरपालिका |
| ७ | श्री. महेश इंगळे | एस.एल.आर. मुंबई शहर | जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे प्रतिनिधी |
| ८ | श्री. वासुदेव बि. पवार | ठाणे महानगरपालिका, तहसिलदार ठाणे | ठाणे महानगरपालिका |
| ९ | श्री. निखील कापसे | डी.सी.पी ऑपरेशन, मुंबई पोलीस | पोलीस आयुक्त यांचे प्रतिनिधी |
| १० | श्री. ए. का. संख्ये | कार्यकारी अभियंता, मुंबई महानगरपालिका | मुंबई महानगरपालिका |
| ११ | श्री. संजय मधुकर धुमाळ | पोलीस निरीक्षक, ठाणे ग्रामीण | पोलीस निरीक्षक, ठाणे ग्रामीण |
| १२ | श्री. विनोद बाळकृष्ण धोत्रे | तहसिलदार बोरीवली | तहसिलदार बोरीवली |
| १३ | श्री. स्टॅलिन डी | वनशक्ती | वनशक्ती |
| १४ | श्री. जगदीश भारती | पोलीस उप निरीक्षक, नवी मुंबई | नवी मुंबई पोलीस यांचे प्रतिनिधी |
| १५ | श्री. बाळकृष्ण जाधव | पोलीस निरिक्षक | रायगड |
| १६ | श्री. अनील गंभीर | पोलीस निरीक्षक | पोलीस अधिक्षक, रत्नागिरी |
| १७ | श्री. अमोल पाठक | तहसिलदार (महसुल), सिंधुदूर्ग | तहसिलदार, सिंधुदूर्ग |
| १८ | श्री. नंदकिशोर देशमुख | अपर तहसिलदार, मिरा-भाईंदर | तहसिलदार मिरा-भाईंदर |
| १९ | श्री. सागर शिवाजी भोसले | पोलीस उप निरीक्षक | जुहू पोलीस ठाणे यांचे प्रतिनिधी |
| २० | श्री. भालचंद्र गवळी | सहा. उद्यान अधिकारी | नवी मुंबई महानगरपालिका |
| २१ | श्री. आत्माराम पाटील | क्षेत्र व्यवस्थापक | एम.आय.डी.सी |

**बैठकीत अनुपस्थित सदस्य.**

१. वसई-विरार, महानगरपालिका यांचे प्रतिनिधी

२. डॉ. महेश शिंधीकर, पाणथळ तज्ञ

३. तहसिलदार वसई जि. पालघर

४.सिडको यांचे प्रतिनीधी.

| अ. क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| * | **पाणथळ क्षेत्राचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने मा. अध्यक्षांनी प्राधान्याने सर्व सदस्यांना दिलेल्या सूचना** | • समितीच्या अध्यक्षांनी मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पाणथळ जागा ही Wetland Atlast नुसार जी जागा पाणथळ आहे त्याचे संरक्षण करण्यासाठी पाणथळ क्षेत्र हे ज्या कोणाच्या ताब्यात आहे त्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्या त्या जिल्हाधिकारी कार्यालयातील Planning Authority ची राहील असे निर्देश मागील बैठकीत दिले होते.<br>• **त्या अनुषंगाने समितीने प्रत्येक जिल्हयाच्या पाणथळ क्षेत्राबाबत यादी तयार करुन National Wetland Atlast नुसार जी जागा पाणथळ आहे, त्यांचे संरक्षण करण्याचे निर्देश दिले.**<br>• **त्यानुसार जिल्हाधिकारी सर्व यांनी त्याच्या क्षेत्रात किती क्षेत्र पाणथळ आहेत तसेच एकूण क्षेत्र किती व त्याची सध्याची सध्यस्थिती काय आहे याबाबतची सविस्तर माहिती समितीपुढे सादर करण्याबाबत सांगितले.**<br>• तसेच जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या क्षेत्रात ४९ जागा पाणथळ क्षेत्रात असून सदर पाणथळ जागेचे संरक्षण करण्याची जबाबदारी ही जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या Planning Authority ची राहिल असे अध्यक्षांनी सांगितले.<br>• तसेच उर्वरित ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील पाणथळ जागेची माहितील प्राधान्याने समितीपुढे सादर करण्याच्या सूचना समितीने दिल्या आहेत. | **संबंधीत सर्व जिल्हाधिकारी** |
| * | **नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीतीबाबत.** | • समितीच्या अध्यक्षांनी पाणथळ तक्रार निवारण समितीमध्ये प्रत्येक वेळी वेगवेगळे अधिकारी उपस्थित राहतात परिणामी तक्रारी निवारण होत नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने सर्व सदस्यांना या समितीबाबत गांभीर्यपूर्वक विचार करुन योग्य नोडल अधिकारीच दरमहा होणाऱ्या बैठकीमध्ये उपस्थित राहतील याची दक्षता घेण्याच्या सूचना सदस्यांना दिल्या आहेत. | **सर्व जिल्हाधिकारी, सर्व महानगरपालिका, सिडको** |
| १ | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून | • मा. आयुक्त Environment Protection Act नुसार SDO तसेच MPCB च्या अधिकाऱ्यांना FIR आणि चार्जशिट दाखल करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी, पालघर यांच्या | तहसिलदार वसई (जिल्हाधिकारी पालघर) |

| | | | |
|---|---|---|---|
| | लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाशकरुन, सीआरझेड, इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव- बांधकामा प्रकरणी. | प्रतिनिधींना दिल्या होत्या.<br>• जिल्हाधिकारी पालघर यांच्या वतीने कोणीही प्रतिनीधी बैठकीत उपस्थित नसल्याने समितीने या बाबत कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे. | |
| २ | श्री. धिरज परब: - भाईंदर पूर्व, जेसलपार्क येथे वसई खाडी किनारी कांदळवन, पाणथळ, सीआरझेड १ मध्ये मेरीटाईम बोर्ड ने जेट्टी, रॅम्प व पालिकेने रस्ता बांधकामे केले बाबत. | • तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, मेरीटाईम बोर्ड यांच्याकडून या तक्रारीबाबतचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत असे सदस्य सचिवांनी सांगितले होते.<br>• तसेच या तक्रारी संदर्भात MCZMA यांच्यामार्फत सदर जागेवर काम करण्याच्या परवानग्या घेण्यात आल्या आहेत परंतु या बाबत कोण्यात्याही प्रकारची कागदपत्रे समितीपुढे अद्याप सादर केलेली नाही.<br>• तसेच MCZMA यांचे कोणीही प्रतिनिधींना बैठकीत उपस्थित नव्हेत, त्यामुळे समितीने MCZMA यांना पुढील बैठकीमध्ये प्राधान्याने उपस्थित राहण्याबाबत पत्राद्वारे कळविण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच समितीने मेरिटाईम बोर्ड यांच्या कडून याबाबत केलेल्या कामाबाबत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | तहसिलदार ठाणे (जिल्हाधिकारी ठाणे) आणि मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि तहसिलदार ठाणे |
| ३ | श्री. धिरज परब: - जेसलपार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळ मध्ये महापालिके कडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास | | |
| ४ | श्री. स्टॅलीन डी - दि.३१.०१.२०१९ Please act to stop illegal destruction of wetlands In Wadala /nearby areas | • या तक्रारीबाबत वडाळा येथे नाला आहे ते पुर्ववत चालू करण्याबाबतच्या सूचना समितीच्या अध्यक्षांनी महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना सांगितले होते.<br>• याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रतिनिधींनी सदर ठिकाणी असलेले नागरीक सदर ठिकाणी असलेला नाला पाणी आत येऊ नये म्हणून बंद करतात असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने BMC यांच्या प्रतिनिधींना सदर ठिकाणी पाण्याचे प्रवाह पुर्व वत करण्याच्या व आवश्यक असल्यास पोलीस यंत्रणेमार्फत सदर ठिकाणी पाण्याचा प्रवाह बंद होणार नाही याची दक्षता घेण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत.<br>• तसेच सदर ठिकाणी विभागीय वन अधिकारी यांच्यामार्फत Mangrove Station लावण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई शहर<br><br>विभागीय वन अधिकारी मुंबई कांदळवन संधारण घटक |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | श्री. सुनिल अगरवाल व श्री. स्टॅलिन डी. २४.०३.२०१९ Drying up of Panje Wetland in Uran & debris dumping in Bhenkhal | • पाणजे येथे कांदळवन असल्यामुळे सदर ठिकाणी असलेले कांदळवनाचे नुकसान होऊ नये यासाठी पाण्याचे प्रवाह खुले ठेवण्याच्या सूचना समितीने सिडको यांच्या प्रतिनिधींना दिल्या आहेत.<br>• सदरची जागा ही २००४ साली रिलायन्स या संस्थेला हस्तांतरीत करण्यात आल्या आहेत असे सिडको यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• पाणजे वेटलॅन्ड हे क्षेत्र CRZ मध्ये येत असेल CRZ चे उल्लंघन झाल्यामुळे सदरची तक्रार जिल्हा स्तरीय **CZMC मार्फत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले तसेच सदरची तक्रार** पर्यावरण विभागाकडे हस्तांतरीत करण्याच्या सूचना समितीने दिल्या.<br>• **सदर ठिकाणी पावसाच्या काळात फक्त सदर ठिकाणचे गेट बंद करण्याचे निर्देश दिले व इतर वेळी पुर्णपणे गेट खुले ठेवण्याचे निर्देश समितीने सिडको यांच्या प्रतिनिधींना दिल्या आहेत.**<br>• तसेच भेणखळचे ही जागा अद्याप Restoration झालेली नाही असे श्री. स्टॅलिन यांनी सांगितले.<br>• त्या अनुषंगाने सदर जागेचे सिडको Planning Authority ने सदरची जागा Restore करण्याची जबाबदारी राहील व सिडको यांनी पर्यावरण विभागाच्या मदतीने सदर जागेबाबत १५ दिवसात योग्य ती कार्यवाही करुन Restore करुन अहवाल सादर करावा असे समितीने निर्देश दिले आहेत. | जिल्हाधिकारी रायगड व सिडको<br>**अहवाल अप्राप्त** |
| ६ | **श्री. समिर सुभाष वर्तक आणि मॅकेन्झी डांबरे दि. २२/०२/२१९** भुईगाव येथील पाणथळ जागेवर तिवरांची कत्तल होऊन अतिक्रमणाबाबत शासनाच्या उदासीन धोरणाबाबत बेमुदत उपोषणाबाबत. | • सदरची जागा Restore करण्यासाठी SDO वसई जि. पालघर योग्य ती कार्यवाही करावी व वसई विरार महानगरपालिकेमार्फत सदर जागेचे Restoration करण्याच्या सुचना समितीच्या अध्यक्षांनी दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी पालघर वसई विरार महानगरपालिका<br>**अहवाल अप्राप्त** |
| ७ | **श्री.धिरज परब यांच्या तक्रारी संदर्भात.** भाईंदरच्या उत्तन येथील एस्सेलग्रुपने ( पॅन | • या तक्रारी बाबत समितीने तहसलिदार, मुंबई उपनगर, पर्यावरण विभागाचे अधिकारी, वन विभागाचे अधिकारी यांनी श्री. हरीश पांडे यांच्या सोबत सदर जागेची पुन्हा स्थळ | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>**अहवाल अप्राप्त** |

| | | | |
|---|---|---|---|
| | इंडिया) कट कारस्थान करून कांदळवनाची प्रचंड तोड व बांध घालून पर्यावरणाचा ऱ्हास केल्या प्रकरणी. | पाहणी करुन त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>• बी.एम.सी, एम.एम आर.डी.चे अधिकरी आणि वन विभाग यांच्यामार्फत एकत्र स्थळ पहाणी करण्याच्या सचूना दिल्या. | |
| ८ | **श्री. फ्रान्सिस डिसोजा:-** अध्यक्ष, हरीत नैसर्गिक वेभव बचाव अभियान, भुईगाव ता. वसई<br>(**मौजे भुईगांव सर्वे क्र.** २२०) | • सदर जागेवरील Restoration ची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे.<br>• समितीने या तक्रारी बाबत तक्रारदारा सोबत पुन्हा स्थळ पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करुन दि.१०.०२.२०२० पर्यंत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>• या तक्रारीबाबत समितीने Restoration ची कार्यवाही करण्यासाठी १५ दिवसात अहवाल सादर करण्याच्या सूचना वसई विरार महागनरपालिकेला देण्याबाबत सांगितले.<br>• तसेच डेब्रिज काढण्यासाठी आवश्यक अंदाजपत्रक १५ दिवसात तयार करुन आयुक्त, मिरा-भाईंदर व वसई विरार महानगरपालिका यांना पाठविण्यात यावे व त्याच्या संरक्षणसाठी आवश्यक Fencing व सी.सी. टी.व्ही कॅमेरा लावण्याबाबत योग्य नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी पालघर आयुक्त, वसई विरार महानगरपालिका |
| ९ | श्री. स्टॅलिन डी<br>दि.२०.०१.२०२०<br>Reclamation of Wetlands left from Kharigaon toll plaza as one drives from Thane to Kalyan. | • सदर ठिकाणची जागा ही खार जमीन आहे तिथे वेटलॅन्ड ॲटलास अनुसार पाणथळ क्षेत्र नाही. तसेच तेथे कांदळवन देखील आहे तसेच तेथील पाण्याचे प्रवाह देखील बंद करण्यात आलेले आहे.<br>• तसेच सदर ठिकाणी भराव देखील करण्यात आला आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार खार जमीन विभागाकडे पाठविण्यास सांगितले व खार जमिन विभागाने यातक्रारीबाबत सखोल चौकशी करून अहवाल सादर करावा असे निर्देश मा. अध्यक्षांनी दिले.<br>• या तक्रारीबाबत समितीच्या अध्यक्षांनी सदर ठिकाणी खार जमीन यांचे कार्यकारी अभियंता, SDO ठाणे, ठाणे महानगरपालिकेचे उप आयुक्त, वनपरिक्षेत्र अधिकारी, भिवंडी यांच्यामार्फत स्थळ पाहणी करुन १५ दिवसात अहवाल सादर करावा व सदर जागेवरील कांदळनास जाणारे पाण्याचे प्रवाह खुले करण्याचे निर्देश दिले आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे व<br>ठाणे महानगरपालिका, पर्यावरण विभाग |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री. बी.एन. कुमार<br>दि.22.01.2020<br>Dangerous burial of wetlands at Ghansoli, Navi Mumbai | • या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी ठाणे आणि सिडको यांच्या प्रतिनिधींना सदर ठिकाणी स्थळ पाहणी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>• तसेच सिडको यांना त्यांच्याकडे असलेले कांदळवन क्षेत्र हे वन विभागास प्राधान्याने हस्तांतरीत करण्यासाठी सिडको यांच्या व्यवस्थापकीय संचालक यांना पत्राद्वारे कळविण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे आणि सिडको |
| ११ | श्री. सुनिल अगरवाल<br>दि.24.02.2020<br>Debris dumping in TS Chanakya Wetlands | • या तक्रारीबाबत समितीने SDO ठाणे आणि सिडको व संबंधीत पोलीस अधिकारी यांच्या सोबत एकत्र स्थळ पाहणी करुन FIR दाखल करण्याच्या व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीपुढे सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे आणि सिडको |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

सदस्य सचिव
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.